दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २३० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.२० नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# कोश्यारींना महाराष्ट्रा बाहेर काढा : संभाजी राजे



**परभणी । वृत्तसंस्था**

**राज्यपाल असं का बडबडतात, मला समजत नाही. याआधीही त्यांच्या वादग्रस्त वक्तव्यानंतर त्यांना महाराष्ट्राच्या राज्यपालपदावरुन हटवावं अशी मागणी मी पंतप्रधान मोदींकडे केली होती. आताही मी तीच मागणी करतोय. खरंच अशी व्यक्तीच आम्हाला महाराष्ट्रात नको. या महाराष्ट्राचे वैभव छत्रपती शिव–ाजी महाराज असंख्य जणांचे प्रेरणास्त्रोत आहेत. महाराष्ट्र भूमी संतांची भूमी आहे. घाणेरडे शब्द आणि इतके घाणेरडे विचार राज्यपालांच्या मनामध्ये येऊच कसे शकतात? यांना राज्यपाल म्हणून ठेवलंत तरी कसं? अशी संतप्त प्रतिक्रिया संभाजीराजे छत्रपती यांनी दिली आहे.**

महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि ज्येष्ठ नेते शरद पवारांची तुलना थेट छत्रपती शिवाजी महाराजांशी केली. तुलना करुनही ते थांबले नाहीत तर छत्रपती शिवराय हे जुन्या काळातील आदर्श असल्याचं म्हणत शिवाजी महाराज तो पुराने जमाने के आदर्श है, अभी तुम्हारे सामने नितीन गडकरी जैसे आदर्श है, असं वादग्रस्त वक्तव्य राज्यपालांनी केलं. त्यांच्या वक्तव्यानंतर सर्वच स्तरातून त्यांच्यावर टीकेची झोड उठत आहे. संभाजीराजेंनी तर थेट त्यांना राज्यपालपदावरुन काढण्याची विनंतीच पंतप्रधान मोदींना केली आहे.

परभणी दौऱ्यावर असलेल्या छत्रपती संभाजीराजे यांना राज्यपालांच्या वादग्रस्त वक्तव्यावर प्रतिक्रिया विचारली असता, ते म्हणाले, पंतप्रधान मोदींनी आधी यांना राज्यातून बाहेर पाठवलं पाहिजे. मागेही अशी मागणी मी केली होती. आताही मोदींना हात जोडून विनंती करतो प्लीज प्लीज अशी व्यक्ती आम्हाला महाराष्ट्रात नको. या महाराष्ट्राचे वैभव छत्रपती शिवाजी महाराज असतील, महापुरुष असतील, संत असतील. त्यांच्याविषयी इतके घाणेरडे विचार राज्यपालांच्या मनामध्ये येऊच कसे शकतात? मोदीजी तुम्ही यांना राज्यपाल म्हणून ठेवता तरी कसं? या व्यक्तीला महाराष्ट्रातून बाहेर काढावं. त्यांना कुठे ठेवायचे तिथे ठेवा.

महाराष्ट्र अशा गोष्टी सहन करणार नाही. किती दिवस आम्ही गप्प बसायचं. शिवाजी महाराजांबद्दल ते पूर्वीही बोलले होते. महात्मा फुलेंबद्दल बोलले होते. इथे येऊन फक्त आमच्या महापुरुषांबद्दल गरळ ओकायची एवढा एकच अजेंडा राबवायचं ठरवलंय का?, असा सवाल छत्रपती संभाजीराजेंनी केला. आम्ही जेव्हा शाळेत जायचो, तेव्हा आम्हाला आमचे शिक्षक विचारायचे, तुमचे आवडते नेते कोण आ–हेत? मग ज्यांना सुभाषचंद्र बोस चांगले वाटायचे, ज्यांना नेहरू चांगले वाटायचे, ज्यांना गांधीजी चांगले वाटायचे ते त्या त्या व्यक्तींचं नाव घ्यायचे. मला असं वाटतं की जर कुणी तुम्हाला विचारलं की तुमचे आवडते हिरो किंवा आदर्श कोण आहेत? तर बाहेर कुठे जायची गरज नाही. इथेच महाराष्ट्रात तुम्हाला ते मिळतील. महाराष्ट्र नवरत्नांची खाण आहे. शिव–ाजी तर जुन्या काळातले आदर्श आहेत. मी नव्या युगाविषयी बोलतोय. डॉक्टर आंबेडकरांपासून डॉ. नितीन गडकरींपर्यंत सगळे तुम्हाला इथेच मिळतील

# गेल इंडिया गॅस पाइपलाईनच्या सुनावणीमध्ये शेतकऱ्यांचा प्रकल्पास प्रचंड विरोध



**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल, पेण व अलिबाग तालुक्यातील विविध गावामधून गेल इंडिया कंपनी कडून प्रोपेन पाईपलाईन तसेच पैट्रोलियम व खनिज पाईप लाईन प्रकल्प जात आहे. या प्रकल्पा संदर्भात १८ नोव्हेंबर रोजी शेतकऱ्यांच्या हरकत अर्जावर गेल इंडिया कडून जे एन पी टी येथील बहुउद्देशीय हॉल मध्ये सुनावणी ठेवण्यात आली होती. या सुनावणीत गेल इंडिया अधिकारी संदीप शर्मा तसेच उपजिल्हाधिकारी अश्विनी पाटील उपस्थित होत्या.

तसेच उरण, पनवेल, पेण व अलिबाग मधून बहुसंख्य शेतकऱ्यांची उपस्थिती पाहण्यात आली. या सुनावणीत सर्व तालुक्यातील शेतकर्यांनी एकाच सुरात गेल इंडिया गॅस पाइ–पलाइन प्रकल्पास विरोध दर्शविला. सरकारने शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी मधून गॅस पाइप–लाइन टाकल्यास शेतकऱ्यांच्या प्रचंड संघर्षांस सामोरे जावे लागेल. दरम्यान शेतजमीनीतुन पाईपलाईन टाकल्यास आजुबाजूचे क्षेत्र देखील लागवडीयोग्य राहणार नाही. शेतक–यांवर भविष्यात उपासमारीची वेळ येणार आहे. त्यामुळे भविष्यात संघर्ष करायला लागले तरी चालेल असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

# पनवेल परिसरात सलग दोन हत्यांच्या घटनेमुळे खळबळ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील नवीन पनवेल व तालुक्यातील तारा गावाच्या हद्दीत दोन वेगवेगळ्या व्यक्तींची वेगवेगळ्या कारणावरून हत्त्या करण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीची माणसे पुन्हा सक्रिय झाली आहेत काय ? अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

नवीन पनवेल येथे आपल्या पत्नीसह रा–हणारा ओमार फारूक हा त्या भागात मजुरीचे काम करायचा हा मूळचा पश्चिम बंगाल येथील रहिवाशी आहे. त्याची नवीन पनवेल से. १८ मधील सिडको गार्डनजवळ मानेवर ,गळ्यावर ,तोंडावर धारदार हत्याराने वार करून हत्या करण्यात आली आहे . सदर हत्या ही नवीन पनवेल भागात राहणाऱ्या पप्पू उर्फ शफिक उल अहमद याने केली असावी असा नवीन पनवेल पोलिसांचा कयास आहे . कारण त्याची ओमार च्या पत्नीवर वाईट नजर होती ही माहिती ओमार ला समजली होती . त्यामुळे त्याचा कायमचा काटा काढण्यासाठी पप्पूनेच त्याची हत्या केली असावी असा संशय ओमारच्या पत्नीने व्यक्त केला आहे . या घटनेनंतर पप्पू फरार झाला असून त्याचा शोध खांदेश्वर पोलीस करीत आहेत . हि घटना ताजी असतानाच तारा गावाच्या हद्दीत लाल रंगाच्या ऑडी कार मध्ये मागच्या सीटखाली मृतदेह कोंबलेल्या अवस्थेत

सापडल्याने खळबळ उडाली होती . पनवेल–पेण रोडवरील तारा गावच्या हद्दीत एका लाल रंगाच्या ऑडी क्रमांक एम एच १४ जीए ९५८५ ही गाडी कागदोपत्री पुणे जिल्ह्यातील तेजस प्रकाश साळवे यांच्या …/२

# मानाच्या अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेतील रायगड जिल्हा प्राथमिक फेरीला सुरुवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मानाच्या 'अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका' स्पर्धेतील रायगड जिल्हा प्राथमिक फेरीचे उद्घाटन दिग्दर्शक, अभिनेते व लेखक दीपक पवार, लेखक व अभिनेते राहुल वैद्य यांच्या हस्ते आज (दि. १९) खांदा कॉलनी मधील सीकेटी महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न झाले.



यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे खजिनदार अमोल खेर, सांस्कृतिक सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, सहसंयोजक गणेश जगताप, चिन्मय समेळ, निखिल गोरे, ओंकार सोष्टे, कौस्तुभ सोमण तसेच सिकेटी महाविद्यालय व टीम अटल करंडक चे सदस्य व कलावंत उपस्थित होते. या रायगड जिल्हा प्राथमिक फेरीत १९ व २० नोव्हेंबरला एकूण २१ एकांकिका सादर होणार आहेत.

नाटय चळवळ वद्धींगत करण्यासाठी व नाटय रसिकांना आपले नाटयाविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वद्धींगत व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृहनेते व नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी 'अटल करंडक एकांकीका' या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व निटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परिक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्य रसिकांच्या गळ्यातील ताईत बनली. दरवर्षी या स्पर्धेला राज्यातील कलाकार आणि प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभत असतो. त्यामुळे हि स्पर्धा राज्यात नावाजली असून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना यंदाही भरघोस रक्कमेची पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे प्रायोजक ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लिमिटेड तर सहप्रायोजक नील ग्रुप आहे.

# कर्जत तालुक्यातील मौजे चोची व कोंढाणे येथील जमीन मिळकती संदर्भात तहसीलदार कर्जत यांच्या कडून आदिवासींना नोटीस

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील मौजे चोची व कोंढाणे येथील जमीन मिळकती संदर्भात तहसीलदार कर्जत यांच्या कडून आदिवासींना कुळवहिवाट ७० ब दावा क्र. ५६/२०२२ च्या नोटीस देण्यात आल्या आहेत,याबाबत या मतदार संघातील माजी राजिप उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी आक्षेप घेतला असून आदिवासी शेतकरी यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची योग्य दखल न घेतल्यास कोंढाणे धरणाविरुद्ध व शासनाविरुद्ध आदिवासी शेतकरी यांच्या न्यायहक्कासाठी त्यांच्यासमवेत जनआंदोलन अथवा उपोषण करण्याचा इशारा घारे यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदनाव्दारे दिला आहे या निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्या सह अन्य संबधीत कार्यालयात पाठवण्यात आल्या आहेत.

कर्जत तालुक्यातील मौजे चोची व कोंढाणे येथील जमीन मिळकती संदर्भात मा. तहसीलदार कर्जत यांस कडून आदिवासी शेतकरी यांस त्यांच्या दालनात सुनावणीस हजर राहण्यास कळविले आहे. परंतु सदर नोटिस संदर्भात सर्व आदिवासी शेतकरी यांनी अर्जाद्वारे आपणाकडे खुलासा सादर करण्यात आला आहे. रायगड जिल्हयातील कोंढाणे धरण शासनाकडून मंजूर झाल्यानंतर जमीन भूसंपादन करण्यासंदर्भात नोटिस जाहीर करून शासनाकडून योग्य ती कार्यवाही सुरू आहे. परंतु मौजे चोची व कोंढाणे ता. कर्जत जि. रायगड मधील मिळकती अस्तित्वात असल्यापासून आदिवासी शेतकरी मिळकतीचे कुळ म्हणून आहेत. आदिवासी शेतक–यांचा संपूर्ण उदरनिर्वाह मिळकत शेतजमीनीवर अवलंबून असून सर्व आदिवासी कुटुंब व आदिवासी कुळ (मालक) असून त्यांस उदरनिर्वाहासाठी दूसरा कोणताही मार्ग नाही.

परंतु हे धरण होऊ घातल्यापासून आदिवासी शेतकरी यांस शासनाकडून अनेक नोटिस देण्यात आलेल्या आहेत. सर्व आदिवासी शेतकरी कोंढाणे धरण होण्यासाठी प्रयत्नशील …/२



# माझी वसुंधरांतर्गत कार्यक्रमात विद्यार्थ्यांना वायु प्रदूषणाची माहीती



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महानगरपालिकातर्फे नुकताच (दि. १८ नोव्हेंबर) लोकनेते दि. बा. पाटील शाळेमध्ये आयुक्त म श्री. गणेश देशमुख व उपायुक्त कैलास गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली 'माझी वसुंधरा अभियानांतर्गत' विद्यार्थ्यांना वायु प्रदूषण विषयक कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी क्लिन एअर क्शन प्लॅनच्या सल्लागार डॉ.गीतांजली कौशिक आणि माझी वसुंधराच्या सल्लागार पूनम घोलप यांनी विद्यार्थ्यांना वायू प्रदूषणाची सामान्य माहिती, हवेतील अपायकारक घटक व वायू प्रदुषणांवरील उपाययोजना याची महिती दिली. स्वच्छतेचे महत्व, ओला व सुका कचऱ्याच्या वर्गीकरणाचे महत्व,वृक्षारोपण अणि वृक्ष संवर्धनाचे महत्व पटवून दिले. यावेळी विद्यार्थ्यांनी 'पर्यावरण हरीत शपथ' घेतली. या कार्यक्रमास महानगरपालिका पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण,शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षक, मुख्याध्यापक उपस्थित होते.

# उरणमध्ये महामार्गावर वेगाने चालणाऱ्या बेशिस्त वाहनांवर दंडात्मक कारवाई

**दै.रायगड नगरी । उरण**

उरणमध्ये प्रवाशाच्या दृष्टीने अनेक रस्ते, महामार्ग झाले आहेत. तसेच मोठ्या प्रमाणात रस्त्यांचे रुंदीकरण झाले आहेत. त्यामुळे अनेक वाहने बेशिस्तपणे सुसाट वेगाने धावू लागले आहेत. नवी मुंबई वाहतूक विभागाने ठरवून दिलेल्या वेगापेक्षाही वाहने आपली मर्यादा सोडून अति वेगाने वाहने चालवीत असल्याने सध्या या वाहन चालकांवर ऑनलाईन दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

जेएनपीए बंदरातून जेएनपीए ते पळस्पे व जेएनपीए ते नवी मुंबई या राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण करण्यात आल्याने जेएनपीए ते पळस्पे व जेएनपीए जासई गव्हाण मार्गे नवी मुंबई या मार्गावर प्रवास वेगवान झाल्याने प्रवाशी, नोकरदार, कर्मचारी वर्गांना कामावर वेळेत जाणे शक्य झाले आहे मात्र वेगावर नियंत्रण नसल्याने येथे या मार्गांवर अनेक अपघात होत असून अनेकांचा अपघातामुळे बळी जात आहे. यापूर्वी या मार्गावर अनेक अपघात झालेले आहेत. अनेकांचा बळी गेलेला आहे.

त्यामुळे या महत्वाच्या मार्गावर वाहणांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्याचे काम वाहतूक पोलिसांकडून करण्यात येत आहे. उरण मधील काही नागरिकांनी वेगाने वाहन चालवील्याने व ठरविलेली मर्यादा …/२



# वंचित बहुजन आघाडी, मनसे आणि शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय जनता पार्टी कामगार आघाडी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष संजय पवार आणि भाजपा वसई विरार जिला मंत्री बिजेंद्र कुमार, उत्तर भारतीय मोर्चा प्रदेश सह संयोजक अमन वैश्य यांचा उपस्थित वंचित बहुजन आघाडी विरार शहर अध्यक्ष व ब्लू टाइगर ट्रस्ट चे ट्रस्टी सिद्धार्थ कदम, महाराष्ट्र नवनिर्माण सेना चे कार्यकर्ता व समाजसेवक किरण मोरे, शिवसेना कार्यकर्ता व ब्लू टाइगर ट्रस्ट चे अध्यक्ष विशाल चौहान यानी भारतीय



जनता पार्टी मधे जाहीर पक्ष प्रवेश केला

त्यांची भाजप कामगार मोर्च्या प्रणित छत्रपती शिवाजी महाराज कामगार सेने मध्ये पदनियुक्ती करण्यात आली. यामध्ये छत्रपति शिवाजी महाराज कामगार सेना, कोंकण विभाग …/२

# धुतूम गावाजवळ डंपरला आग

**दै.रायगड नगरी । उरण**

येथील जेएनपीए ते पळस्पे राष्ट्रीय महामार्गावरील धुतुम गावा जवळ शुक्रवारी ( दि१८) एका डंपर ला आग लागल्याची घटना घडली आहे.अचानक डंपरला लागलेल्या आगीमुळे डंपर चालकाने चालत्या वाहनातून उडी मारल्याने त्याचा जीव वाचला आहे. या आगीमुळे काही काळ या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली होती.डंपरला लागलेल्या या आगीचे कारण समजू शकले नाही.

उरण तालुक्यातील भर रस्त्यात अचानकपणे वाहनाना आग लागण्याच्या घटना वाढल्या आहेत. अशाच प्रकारची घटना उरण शहरांमध्ये, गव्हाण फाटा येथे या अगोदर घडली आहे. जेएनपीए ते पळस्पे या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३४८ वरून दररोज जेएनपीटी बंदर परिसरातील ज्वलनशील पदार्थ तसेच भारत पेट्रोलियम मधील वायू ची वाहतूक करणारी …/२

# राहुल यांची 'वाद'चाल

राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेला जवळपास ७२ दिवस पूर्ण झाले असून एकूण साडेतीन हजार किलोमीटरच्या यात्रेत आतापर्यंत जवळपास दीड हजारपेक्षा अधिक किलोमीटरचे अंतर पार केल्यानंतरही राहुल गांधी व त्यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाची फारशी दखल पंतप्रधान नरेंद्र मोदी वा भाजपच्या एकाही शीर्षस्थ नेत्याने अद्याप घेतलेली नाही. राजकारणामध्ये अदखलपात्र होण्यासारखी दुसरी कोणतीही नामुष्की असू शकत नाही. एखादवेळेस विरोधकांनी पातळी सोडून केलेली टीकाही राजकीयदृष्ट्या फायदेशीरही ठरते. मात्र एखादा पक्ष वा नेत्याच्या राजकीय कृतीमुळे विरोधकांच्या राजकारणावर ओरखडाही उठत नसेल, तर अस्वस्थता येणे स्वाभाविक आहे. राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेला जवळपास ७२ दिवस पूर्ण झाले असून एकूण साडेतीन हजार किलोमीटरच्या यात्रेत आतापर्यंत जवळपास दीड हजारपेक्षा अधिक किलोमीटरचे अंतर पार केल्यानंतरही राहुल गांधी व त्यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाची फारशी दखल पंतप्रधान नरेंद्र मोदी वा भाजपच्या एकाही शीर्षस्थ नेत्याने अद्याप घेतलेली नाही. या अस्वस्थेमुळेच राहुल गांधी यांनी गेला दीड आठवडा ही यात्रा महाराष्ट्रात असताना व यात्रेला इतर राज्यांप्रमाणेच चांगला प्रतिसाद मिळत असताना स्वातंत्र्यवीर सावरकरांबाबतचा विवाद उकरून काढला असावा का, अशी शंका घेण्यास जागा आहे. विचारधारेशिवाय राजकारण होत नाही. किंबहुना त्या विचारधारेनुरूप राज्यकारभार चालावा यासाठीच राजकीय पक्ष जनतेला सोबत घेण्यासाठी आपल्या विचारधारेचा प्रचारही करत असतात. मात्र अगदी प्राचीन काळापासून शक्तीशाली सत्ताधाऱ्यांचा पराभव करण्यासाठी विरोधी विचारांच्या राजकीय शक्तीही एकत्र येण्याची असंख्य उदाहरणे इतिहासात आहेत. दुसऱ्या महायुद्धात, साम्यवादी जोसेफ स्टॅलिन व भांडवलशाहीचे कट्टर पुरस्कर्ते इंग्लंड व अमेरिका यांची आघाडी त्याचं सर्वात मोठं उदाहरण. चीनच्या क्रांतीत जपानी साम्राज्यावादाच्या विरोधात माओ त्से तुंग यांनी च्यांग कै शैक याच्याशी केलेली आघाडीही त्यातलाच प्रकार. बलाढ्या काँग्रेसला भारतात मात देण्यासाठी डॉ. राममनोहर लोहिया यांनी केलेली बडी आघाडी किंवा नंतर जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली झालेला जनता पार्टीचा प्रयोग असो की अटलबिहारी वाजपेयी यांनी कलम ३७० व राम मंदिराचा मुद्दा बाजूला ठेवत समता, ममता, जयललिता यांच्यासोबत बांधलेली 'एनडीए'ची मोट असेल, यातून एकच गोष्ट स्पष्ट होते की, राजकारणात बलाढ्य शत्रूला मात द्यायची असल्यास अनेकदा आपल्या विचारधारेबाबत काही काळासाठी का होईना, लवचिक धोरण स्वीकारणे ही राजकारणाची अपरिहार्यता आहे. राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांबाबत केलेले विधान किती खरे वा किती खोटे याची कसोटी राजकीय आखाड्यात लागत नाही. ते इतिहास संशोधक मंडळ वा विद्यापीठीय चर्चासत्रे वा संशोधन केंद्रांचे काम आहे. मात्र या विधानामुळे तयार झालेल्या विवादामुळे महाराष्ट्रातील शिवसेनेसारखा मित्र दुखावून त्यांनी नक्की काय साधले? मुळात ही भारत जोडो यात्रा काँग्रेसच्या मजबुतीकरणासाठी आहे की नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली अपराजित वाटणाऱ्या भाजपला शह देण्यासाठी आहे, याचा विचार त्यांनी करणे गरजेचे होते. यात्रा निघाल्यापासूनच राहुल गांधी व त्यांच्यासोबत असणाऱ्या त्यांच्या हरकाम्यांनी त्या त्या राज्यातील भाजप विरोधी पक्षांवर टीका करण्याचेच धोरण अवलंबिलेले दिसते. यात्रेच्या सुरुवातीच्या टप्प्यातच केरळमध्ये राहुल यांच्या यात्रेचे नियोजनप्रमुख जयराम रमेश यांनी पिनराई विजयन यांना मुंडू नेसलेले मोदी असे म्हणत हिणवले. यात्रा तेलंगणात पोचल्यावर स्वतः राहुल गांधी यांनी के. चंद्रशेखर राव हे नरेंद्र मोदी यांच्या आदेशानेच राज्य चालवत असल्याचा आरोप केला. २०२४ साली लोकसभेच्या निवडणुका होणार आहेत. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली २०१४ आणि २०१९ या दोन लोकसभा निवडणुकांत काँग्रेसने केलेली कामगिरी सर्वश्रुत आहे. दरम्यानच्या काळात राज्यांच्या निवडणुकांमध्येही काँग्रेसचे काय झाले, हे सगळे जाणतात. पंजाबसारख्या राज्यात जिथे भाजप औषधालाही नाही तिथले राज्यही नवज्योतसिंग सिद्धूसारख्या व्यक्तीवर विश्वास ठेवून हातचे घालवण्याची किमया काँग्रेस पक्षाने राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली करून दाखवलेली आहे. हे सगळे भाजपच्या अजस्त्र प्रचार यंत्रणेच्या पार्श्वभूमीवर घडलेले आहे. हे सांगण्याचे मुख्य कारण म्हणजे राहुल गांधीच्या प्रतिमाभंजनात या यंत्रणेचा मोठा हात असल्याचा आरोप कायम होत असतो. तो काही अंशी खरा असला तरी काँग्रेस पक्षाच्या रणनीतीचे खापर इतर कुणावर फोडता येणार नाही. मोदींची लोकप्रियता व भाजप कार्यकर्त्यांची शिस्तबद्ध फळी हा चक्रव्यूह भेदायचा असल्यास राष्ट्रीय पातळीवर भाजपेतर पक्षांच्या आघाडीशिवाय पर्याय नाही, असे आता जवळपास सर्वच भाजपेतर नेत्यांचे म्हणणे आहे. याकरिता आपल्या कट्टर भूमिका, तीव्र प्रतिक्रिया वगैरे गोष्टी काही काळासाठी बाजूला करणे क्रमप्राप्त आहे. असे असताना या यात्रेच्या निमित्ताने राहुल यांनी दाखवलेला दृढ निश्चय आणि संयम भाजपच्या दुर्लक्षिण्याच्या रणनितीमुळे अखेर तुटला असेच विनाकारण सावरकरांवरून सुरू केलेल्या विवादामुळे म्हणावे लागेल. यात्रेतून मिळणारी लोकप्रियता व लोकांच्या विश्वासाचे भाजपेतर पक्षांची मोट बांधून मतात परिवर्तन झाले नाही, तर या पदयात्रेचे श्रम मातीत जाण्याचीच भिती अधिक!

# कोकणातील सर्व रेल्वेस्थानकांचा कायापालट करणार : ना.रवींद्र चव्हाण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोकण रेल्वेच्या सर्व प्रमुख स्थानकांच्या सुशोभिकरणाची प्रक्रिया येत्या सात दिवसांत सुरु करण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी आज दिले.

कोकण रेल्वे स्थानक ते मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांचे मजबुतीकरण, नूतनीकरण, स्थानकांचे सुशोभिकरण आदी विविध विषयासंदर्भात सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. चव्हाण यांच्या उपस्थितीत आज बैठक झाली. त्यावेळी कोकण रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी आणि रेल्वे पोलीस अधिकारी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

तसेच कोकण रेल्वेच्या सर्व स्थानकांच्या बाहेरील सर्व प्रमुख रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्याची प्रक्रिया तातडीने सुरु करा. त्याचप्रमाणे कोकण रेल्वे मार्गावरील रत्नागिरी व कणकवली येथे सुसज्ज रेल्वे पोलीस ठाणे उभारण्याच्या प्रक्रियेला वेग देण्याच्या सूचनाही मंत्री श्री. चव्हाण यांनी दिल्या. या निर्णयामुळे कोकणवासियांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळणार असून लवकरच कोकण रेल्वेची स्थानके व परिसराचा कायापालट होणार आहे. मुंबईसह देशातील प्रमुख विमानतळांचे उत्कृष्टरित्या सुशोभिकरण व अत्याधुनिकीकरण करण्यात आल्यामुळे प्रवाशांना उत्तम सोयी–सुविधा उपलब्ध होतात. याच धर्तीवर कोकण रेल्वेमार्गावरील सर्व स्थानकांचे सुशोभिकरण व आधुनिकीकरण करण्याच्या सूचना यावेळी मंत्री श्री. चव्हाण यांनी दिल्या. तसेच, कोकण रेल्वे प्रशासनाने सुशोभिकरणासंदर्भात पुढाकार घेणे अत्यावश्यक आहे, असेही मंत्री श्री. चव्हाण यांनी स्पष्ट केले.

मुंबई– कोकणातून दरदिवशी हजारो प्रवासी कोकण रेल्वेने प्रवास करतात. त्यामुळे ही सर्व रेल्वे स्थानके सुसज्ज करावीत. विनाविलंब येत्या सात दिवसांत याबाबत कार्यवाही सुरु करण्याचे निर्देशही मंत्री चव्हाण यांनी दिले. कोकण रेल्वे स्थानकांकडे जाणारे रस्ते काँक्रिटीकरण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची तयारी असून या प्रमुख रस्त्यांच्या क्रॉकिटीकरणासाठी सुमारे १०० कोटी खर्च अपेक्षित आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पनवेल परिसरात सलग दोन हत्यांच्या घटनेमुळे खळबळ

मालकीची दिसत आहे. सदर गाडी तारा गावच्या हद्दीत एका फार्म हाऊस समोर गेल्या २ दिवसापासून उभी होती. या गाडीत एका पुरुषाचा मृतदेह असून त्याने अंगावर टीशर्ट, जीन्स पॅन्ट घातलेली असून पायात स्पोर्ट्‌स शूज होती . या संदर्भात पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांना माहिती मिळताच ते आपल्या पथकासह घटनास्थळी रवाना झाले व त्यांनी सदर मृतदेहा संदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी तपास सुरु केला असता सदर मयत व्यक्ती ही संजय मारुती कार्ले ( वय ४५ ) रा. तळेगाव दाभाडे असे असून या व्यक्तीचे अनेक व्यवसाय असल्याचे प्राथमिक माहिती मिळाली आहे . ही व्यक्ती विवाहित असून या हत्ये संदर्भात त्याच्या कुटूंबियाना माहिती मिळताच शनिवारी सकाळी त्यांच्या कुटूंबियांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन मृतदेहाची ओळख पटवून घेतली आहे . व इतर शासकीय कागदपत्रांची पूर्तता करून कार्ले कुटुंबीयांनी सदर मृतदेह ताब्यात घेतला आहे . यावेळी त्या कुटुंबीयांनी दिलेल्या महत्वपूर्ण अश्या माहितीच्या आधारे पनवेल तालुका पोलिसांची पथके ठिकठिकाणी रवाना झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

## जमीन मिळकती संदर्भात तहसीलदार कर्जत यांच्या कडून आदिवासींना नोटीस

असून शासनास त्यांनी वेळोवेळी सहकार्य केले आहे. परंतु सदरील मिळकती जमिनीचा सातबारा सदरी सावकार म्हणून असलेल्या व्यक्तींना काही शासकीय अधिकारी यांनी विश्वासात घेऊन सावकाराकडून कुळांवर कुळ हटविण्यासाठी दावे करण्यात आलेले आहेत, परंतु आजपर्यंत सर्व आदिवासी शेतकरी या मिळकतीमध्ये शेतजमीन करीत असून सदरील मिळकतीवर संपूर्ण ताबेकबजा आदिवासी शेतकरी यांचा असून आजपर्यंत सावकाराकडून कोणताही हस्तक्षेप करण्यात आलेला नव्हता, परंतु सदरील मिळकत कोंढाणे धरणामध्ये भूसंपादन होणार आहे व त्याचे तशी जाहीर नोटिस झालेली आहे. सदरील मिळकत कोंढाणे धारणामध्ये जात आहे ही बाब शासकीय अधिकारी यांच्या निदर्शनास येता व तशी जाहीर नोटिस झाल्यानंतर काही शासकीय अधिकारी सावकाराशी संगनमत करून कुळ हटविण्याचा प्रयत्न करीत आहेत, व त्याबाबत तहसीलदार कर्जत यांस कडून आदिवासी शेतकरी यांस नोटिस देण्यात आलेल्या आहेत, शासकीय अधिकारी हे आपल्या स्वार्थासाठी कुळ हटवून आपल्या नातेवाईकांच्या नावे जमीन खरेदी करण्याच्या प्रयत्नात आहेत असे आदिवासी शेतकरी यांचे म्हणणे असून तसा दबाव शासकीय अधिकारी यांसकडून शेतकरी यांच्यावर निर्माण केला जात आहे.

शासनाकडून नोटिस जाहीर झाल्यानंतर कुळ हटविणे नियमबाह्य आहे. तरी सदरील मिळकती संदर्भात संबंधित शासकीय अधिकारी यांस योग्य त्या सूचना देवून आदिवासी शेतकरी कुटुंबावर होणारा अन्याय दूर होईल व न्याय मिळेल आशा सूचना आपणांकडून देण्यात याव्यात. शासनाकडून नेमणूक करण्यात आलेल्या शासकीय अधिकारी यांस कडून अश्या प्रकारे शासकीय नियमांची पायमल्ली व आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून आदिवासी शेतकरी यांच्यावर दबाव टाकून फसवणूक करीत असल्यास आपणामार्फत याची चौकशी करून कोंढाणे धरण संबंधित संपूर्ण शासकीय कामकाजासाठी स्वतंत्र अधिकारी यांची नेमणूक करण्याची विनंती करीत आहे. सदर प्रकरणाची आपणाकडून योग्य दखल घेतली जाईल ही अपेक्षा आहे परंतु आदिवासी शेतकरी यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची योग्य दखल न घेतल्यास कोंढाणे धरणाविरुद्ध व शासनाविरुद्ध आदिवासी शेतकरी यांच्या न्यायहक्कासाठी त्यांच्यासमवेत जनआंदोलन अथवा उपोषणाचा मार्ग पत्करावा लागेल असे निवेदनात नमूद केले आहे.

## उरणमध्ये महामार्गांवर वेगाने चालणाऱ्या बेशिस्त वाहनांवर दंडात्मक कारवाई

ओलांडल्याने उरण मधील नागरिकांवर २ हजार रुपयाची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसा मेसेज त्या व्यक्तीला मोबाईलवर पोहोचला आहे.या दंडात्मक कारवाईमुळे अनेक वाहन चालक आपापली वाहने आता मर्यादित वेगाने चालवत आहेत.

जेएनपीए ते पळस्पे व जेएनपीए ते नवी मुंबई मार्गावर अनेक अपघात होत असल्याने वेगावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. यामुळे अपघातांचे प्रमाण कमी होणार आहे. शिवाय वाहन चालकांच्या वेगावरही मर्यादा येणार आहे. या यंत्रणेमुळे आता वाहन चालकाकडुन सावधानता बाळगली जाऊ लागली आहे.

## पदाधिकाऱ्यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश

सचिवपदी किरन मोरे, महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी विशाल विनायक चौहान, कार्यकारणी सदस्यपदी ॲडव्होकेट मिनी उपाध्याय, वसई विरार जिला महामंत्रीपदी सिद्धार्थ कदम यांची नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तबद्दल सर्व राजकीय स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात आले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## धुतूम गावाजवळ डंपरला आग

वाहने ये– जा करीत असतात, त्यामुळे या मार्गवर आशा प्रकारे वाहनांना आग लागणे धोक्याचे आहे.

धुतूम गावाजवळ डंपरला लागलेली आग अग्निशमन दलाच्या जवानांनी विझवली आहे. मात्र डंपरच्या आगीच कारण समजू शकलेले नाही.परंतु याच धुतूम गावाजवळ आय ओ टी हा ज्वलनशील पदार्थ साठवू ठेवणारा महत्वाचा प्रकल्प आहे.त्यामुळे धुतूम गावातील जागूत नागरीकांमुळे मोठा अनर्थ टळला असल्याची प्रतिक्रिया भाजपचे उपतालुकाप्रमुख प्रकाश ठाकूर व सामाजिक कार्यकर्ते प्रेमनाथ ठाकूर यांनी व्यक्त केली आहे.

## पनवेल मध्ये विद्यार्थी सुरक्षितताय 'संवाद' परिषद

# पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेच्या वतीने आयोजन ; विद्यार्थी वाहक, पालक, परिवहन, वाहतूक विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विद्यार्थ्यांना घरापासून शाळा आणि शाळेतून घरी सुरक्षितपणे ने आण करण्याच्या अनुषंगाने स्कूल व्हॅनचालक आपले कर्तव्य प्रामाणिकपणे करत आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थी सुरक्षितताय 'संवाद' परिषदचे आयोजन रविवारी सकाळी ११ वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले आहे.

या निमित्ताने लोकप्रतिनिधी, पालक विद्यार्थी ,वाहक, शालेय व्यवस्थापन प्रतिनिधी, शालेय शिक्षण विभाग परिवहन, वाहतूक आणि स्थानिक पोलीस अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची शाळेत सुरक्षितपणे ने –आण केली जाते. संस्थेचे सभासद हे स्कूल व्हॅन त्याचबरोबर स्कूलबस च्या माध्यमातून 'विद्यार्थी वाहक' म्हणून अत्यंत चोखपणे कर्तव्य बजावतात. 'विद्यार्थी हिताय. विद्यार्थी सुरक्षिताय' हे ब्रीदवाक्य घेऊन संस्था गेल्या काही वर्षांपासून कार्यरत आहे.

कोरोना वैश्विक संकटानंतर तब्बल दोन वर्षांनी शाळा प्रत्यक्षरीत्या सुरू झाल्या. टाळेबंदी मध्ये संस्थेच्या सभासदांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीला तोंड दिले. पालकांना सुद्धा खूप मोठ्या संकटाला सामोरे जावे लागले. तदनंतर सर्वच शाळा प्रत्यक्ष सुरू झाल्या आहेत. असे असले तरी आजही विद्यार्थी वाहकांना अनेक अडचणी, त्याचबरोबर जटिल प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. यावर तोडगा आणि मार्ग निघणे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून हितावह ठरेल. त्याचबरोबर पालक वर्गांच्याही काही तक्रारी त्याचबरोबर अडचणी असू शकतील. या सर्व व्यवस्थेमध्ये शाळा व्यवस्थापन, परिवहन, वाहतूक पोलीस आणि शिक्षण विभागाची भूमिका आणि मार्गदर्शन ही महत्त्वाचे आहे.

या सर्वांचा समन्वय साधने अत्यंत आवश्यक आहे. या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दिनांक २० नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ११ वाजता पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये 'विद्यार्थी सुरक्षितताय समन्वय परिषदेचे' आयोजन करण्यात आले आहे.

या बरोबरच रस्ता सुरक्षितता चर्चा सत्र संपन्न होणार आहे. या परिषदेला पालक बंधू– भगिनी, शाळा व्यवस्थापन प्रतिनिधी, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, शिक्षक विद्यार्थी वाहतूक संघटना पदाधिकारी, स्कूल बस चालक मालक आणि उपस्थित राहून हे अभियान यशस्वी करावे असे आवाहन पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पांडुरंग हुमणे यांनी केले आहे.


प्रोसेस जमा रु.५०/– वकील : श्री.ए.टी.चौधरी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायालय (व.स्तर) पनवेल यांचे कोर्टात

चौ.अर्ज क्र.१२५६/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०४/०१/२०२३

१) श्री.पांडुरंग धर्मा म्हात्रे
वय : ५९ वर्षे, व्यवसाय : शेती / नोकरी
रा.मु.नितळस, पो.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.पद्मा नारायण काठे
वय : ६१ वर्षे, व्यवसाय : शेती / नोकरी
रा.मु.नितळस, पो.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.कल्पना भारत भाग्यवंत
वय : ५८ वर्षे, व्यवसाय : शेती / नोकरी
रा.मु.नितळस, पो.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

वरील अर्जदार यांचे वडील श्री.धर्मा कालू म्हात्रे हे दि.१९/११/२०२० रोजी तळोजा पोलीस स्टेशन, ता.पनवेल, जि.रायगड यांचे हद्दीतील मु.नितळस, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घररी सन साली निधन झाले. त्यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : मु.नितळस, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे जमीन मिळकत**

| अ.क्र. | घर नं. | क्षेत्रफळ हे.आर.प्रती | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १ | | २९.२८ | ५० |

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील अर्जदाराच्या वारसदखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंती प्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१९/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.मुजावर साहेब यांचे कोर्टात
ॲड.प्रदीप भोईर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१६८२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.५/१/२०२३

१) श्री.बबन किसन देसाई
वय : ६० वर्षे, धंदा : नोकरी
२) कु.प्रणाली बबन देसाई
वय : २७ वर्षे, धंदा : शिक्षण
३) कु.प्रसाद बबन देसाई
वय : २४ वर्षे, धंदा : शिक्षण
सर्व रा.२३/१२२३, एम.एच.बी.कॉलनी,
खेर नगर, वांद्र (पूर्व), मुंबई ५१ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांची पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ यांची आई मयत कुसूम बबन देसाई या दि.२२/०५/२०२० रोजी मयत झाल्या आहेत. मृत्यूसमयी मयत कुसूम बबन देसाई यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**स्वप्नपूर्ती हौसिंग स्कीम, फ्लॅट नं.६०१, सहावा मजला, एलआयजी बिल्डींग नं.एल–२९, क्षेत्र ३४, ३६० चौ.मी. (कारपेट), सेक्टर नं.३६, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

अर्जदार यांनी सदरील चौकशी अर्ज मयत कुसूम बबन देसाई यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सबब सदरल चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांचे क्लेम संबंधात जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल, हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि.१९ नोव्हेंबर २०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

मे.इंदलकर सो
ॲड.विजयेंद्र नारायण मुंढे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात

क्रि.एम.ए.नं.१११३/२०२२
ने.ता.२७/१२/२०२२

श्री.योगेश कपिलदेव गौर
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.रुम नं.३, प्लॉट नं.५ बी, बिल्डींग नं.१२,
सुयोग अपार्टमेंट, गणेश मंदिर, सेक्टर–१,
खांदा कॉलनी, पनवेल–रायगड अर्जदार
विरुद्ध
पनवेल शहर महानगरपालिका
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडील कै.कपिलदेव रामरतन गौर यांचा मृत्यू दि.२६/०२/२०२० रोजी रुम नं.३, प्लॉट नं.५ बी, बिल्डींग नं.१२, सुयोग अपार्टमेंट, गणेश मंदिर, सेक्टर–१, खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे म्हणून अर्जदार यांनी या न्यायालयात सदर कै.कपिलदेव रामरतन गौर यांचे मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकामी पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदर कै.कपिलदेव रामरतन गौर हे वर नमूद ठिकाणी मयत झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या नाही, तर सदर न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१९/११/२०२२ रोजी दिली.

सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

मे.गुन्नाल साहेब
ॲड.अमोल जयंत पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१४३७/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०६/१२/२०२२

१) श्रीमती.मिनल शेखर गातारे
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.किन्नरी शेखर गातारे
वय : २८ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.शार्दुल शेखर गातारे
वय : २४ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.फ्लॅट नं.३०६, गुरुपुष्प
को.ऑ.हौ.सो., साईनगर, साईनगर रोड,
गोल्डन हार्वेस्ट जवळ, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ हिचे पती व अर्जदार नं.२ ते ३ यांचे वडील कै.शेखर दत्तू गातारे हे दि.१६/०७/२०२० रोजी सनशाईन हॉस्पिटल, नेरुळ, नवी मुंबई येथे मयत झाले असून कै.शेखर दत्तू गातारे यांची आई म्हणजेच अर्जदार नं.१ ची सासू व अर्जदार नं.२ व ३ ची आजी कै.पार्वती दत्तू उर्फ दत्तात्रय गातारे ह्या दि.०८/०३/२०१६ रोजी गांधी हॉस्पिटल, पनवेल येथे मयत झाल्या आहेत. कै.शेखर दत्तू गातारे यांच्या नावे मौजे : पनवेल येथे पनवेल महानगरपालिका हद्दीत खालील वर्णनाच्या फ्लॅट मिळकती पनवेल महानगरपालिकेकडे नोंदणीकृत असून सदर फ्लॅट मिळकतींचे कै.शेखर दत्तू गातारे हे रितसर मालक आहेत.

**फ्लॅट मिळकतींचे वर्णन**

| अ.नं. | फ्लॅट मिळकतींचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | फ्लॅट नं.२, तळमजला, डायमंड पार्क को.ऑ.हौ.सो.लि., पनवेल, फायनल प्लॉट नं.१०८, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | ३३ चौ.मीटर (कारपेट) (४४० चौ.फुट बिल्टअप) |
| २ | फ्लॅट नं.३०६, तिसरा मजला, गुरुपुष्प को.ऑप. हौ.सोसायटी लि. पनवेल, स.नं. ७४६/१ ए, ७४६/१ बी, प्लॉट नं.१०, साईनगर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | ७०२ चौ.फुट (कारपेट) +१३९ चौ.फूट ओपन टेरेस |

वर वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीं संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केला आहे. वरील फ्लॅट मिळकतीत अर्जदार यांचा कायदेशीर हक्क व अधिकार असल्याने सदर फ्लॅट मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.१८/११/२०२२ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## कर्नाळा अभयारण्याचा आता होणार 'बोध'

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील कर्नाळा पक्षी अभयारण्याचा लोगो तयार करण्यात आला आहे. स्पर्धात्मक पद्धतीनं निर्माण करण्यात आलेल्या या बोधचिन्हाचे नुकतेच अनावरण झाले. रायगडचा पक्ष म्हणून जाहीर झालेल्या तिबोटी खंड्याचे मनमोहक चित्र त्यावर असल्याने पक्षप्रेमी आणि पर्यटकांना खऱ्या अर्थाने अभयारण्याचा बोध होणार आहे.

मुंबईपासून काही तासाच्या अंतरावर असलेल्या कर्नाळा या निसर्गरम्य ठिकाणी वर्षभर मोठया प्रमाणात पर्यटक येतात. लोणावळ्याप्रमाणे कर्नाळा उंचावर असल्याने येथील हवाही नेहमी थंड असते. निसर्ग, हवेतील गारवा आणि शांतता यांचा संगम असलेल्या या अभयारण्यात दोन प्रकारची वने आहेत. याशिवाय, रानखाटीक, ठिपकेवाला सातभाई, कस्तुर, शिंपी, गिधाड, मुनिया, नाचन,सुगरण, बया, सुरेल, खाचू कवटा, राखी धोबी, भारतव्दाज, शामा, मोर, फुलटोचा, पावशा,बहिरा, कापशी घार, नीळकंठ पोपट, सुर्यपक्षी, हरियल यासारखे सुमारे १३४ प्रजातीचे स्थानिक तर ३८ प्रजातीचे स्थलांतरीय पक्षी आहेत.अभयारण्य परिसरात ओरीटयल टोग किंगफिशर अत्यंत आकर्षित असा स्थलांतरित पक्षी बाहेरील देशातून येतो. त्याला तिबोटी खंडया असेही म्हटले जाते. साधारणता मे महिन्याच्या शेवटी हा पक्षी या परिसरात येतो. आणि सप्टेंबर महिन्यात पुन्हा परततो.श्रीलंक,मलेशिया, इंडोनेशिया मार्गे हा पक्षी भारतात येतो विशेषता कर्नाळा अभयारण्यामध्ये तो पावसाळ्यामध्ये राहतो. तिबोटी खंड्याला रायगडच्या पक्षाचा दर्जा देण्यात आला आहे. एकंदरीतच कर्नाळा अभयारण्यात येणारे पक्ष प्रेमी आणि पर्यटकांची संख्या वाढावी या अनुषंगाने वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जातात. अभयारण्याची ओळख आणि येथील पक्षांचा बोध व्हावा या उद्देशाने बोधचिन्ह स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. संकेत मोरे या चित्रकाराच्या लोगोला प्रथम पसंती देण्यात आली. हेच बोधचिन्ह आता कर्नाळा पक्षी अभयारण्याची ओळख असणार आहे. या बोधचिन्हांचे अनावरण अभयारण्यात पार पडले. यावेळी उपवनसंरक्षक वन्यजीव ठाणे सरोज गवस, सहाय्यक वनसंरक्षक फणसाड नंदकिशोर कूप्ते,ए.ए.चव्हाण मानद वन्यजीव रक्षक, कृपा पाटील, पर्यावरण तज्ज्ञ वर्षा रेड्डी,तांत्रिक सल्लागार व वनपरिक्षेत्र अधिकारी कर्नाळा पक्षी अभयारण्य एन.डी राठोड आणि रेंज स्टाफ तसेच वन परिक्षेत्र अधिकारी फणसाड अभयारण्य टी.पी.काळभोर यांच्या सह कर्मचारी व पर्यटक उपस्थितीत होते. दरम्यान कर्नाळा अभयारण्य परिसर उरण विधानसभा मतदारसंघात आहे. परिणामी स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून बोधचिन्ह अनावरण कार्यक्रमाला आमदार महेश बालदी यांना प्रोटोकॉल नुसार निमंत्रित करणं क्रमप्राप्त होता. मात्र अभयारण्य प्रशासनाने त्यांना एक दिवस अगोदर निमंत्रण दिले. किमान काही दिवस अगोदर याबाबत माहिती देणे आवश्यक होतं. नियोजित दौऱ्यामुळे या कार्यक्रमाला उपस्थित राहता येणार नाही. तो स्थगित करून नव्याने तारीख निश्चित करावी अशाप्रकारे आमदार बालदी आणि सूचित केले होते. त्या ठिकाणी सहमती सुद्धा वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दर्शवली. मात्र प्रत्यक्षात कार्यक्रम ठरलेल्या दिवशीच करण्यात आला.

मे.गुन्नाल साहेब

अर्जदाराचे वकील ॲड.सलमान पटेल

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६४९/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.०५/०१/२०२३

१) श्रीमती.अस्मा अब्दुल अजीज पटेल
वय : ५६ वर्षे, धंदा : घरकाम
२) श्री.अदनान अब्दुल अजीज पटेल
वय : ३१ वर्षे, धंदा : व्यवसाय
३) अरफान अब्दुल अजीज पटेल लग्नानंतर
सौ.अरफान समीर धुरू
वय : ३९ वर्षे, धंदा : घरकाम
४) अफसाना अब्दुल अजीज पटेल लग्नानंतर
सौ.अफसाना नाशीर धोनगरे
वय : ३७ वर्षे, धंदा : घरकाम
५) श्री.मन्नान अब्दुल अजीज पटेल
वय : २९ वर्षे, धंदा : व्यवसाय
६) श्री.शादाबा अब्दुल अजीज पटेल
वय : २३ वर्षे, धंदा : व्यवसाय
७) श्री.अरफात अब्दुल अजीज पटेल
वय : १९ वर्षे, धंदा : व्यवसाय
८) श्री.अरबाज अब्दुल अजीज पटेल
वय : १९ वर्षे, धंदा : व्यवसाय
९) कुमारी.हिना अब्दुल अजीज पटेल
वय : २६ वर्षे, धंदा : घरकाम
अर्जदार क्र.१, २ व ५ ते ९ रा.तळोजा गाव,
ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार क्र.३
रा.२०४, दौड शाह मार्ग, कोपरखैरणे, ठाणे,
अर्जदार क्र.४ रा.दामत गाव, ता.कर्जत, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, अर्जदार क्र.१ चे पती व २ ते ९ चे वडील पै.अब्दुल अजीज ईब्राहीम पटेल हे दि.०१/०९/२०१७ रोजी मौजे : मु.पो.तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. पै.अब्दुल अजीज ईब्राहीम पटेल यांची सहहिस्सेदारांबरोबर मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथील त्यांचे मालकीची, नावे असलेली तसेच प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णनाच्या मिळकती / शेतजमिनी होत्या.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| तळोजा पाचनंद | १५ | ७१ | ० | १३-११-० |

मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर वर्णन केलेल्या शेतजमिनीच्या मिळकती सिडकोतर्फे संपादीत झालेल्या आहेत. सबब सदर संपादीत मिळकतीबाबत पै.अब्दुल अजीज ईब्राहीम पटेल यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदर वारस दाखल्याच्या कामी कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार याचे लाभांत वारसदाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१९/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## माथेरानच्या निवेदिता रमेश साळुंखेची बॉल बॅडमिंटन स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

गडचिरोली येथे राज्यस्तरीय बॉल बॅडमिंटनच्या स्पर्धा सुरू आहेत पुणे जिल्ह्याच्या संघातून माथेरानची निवेदिता रमेश साळुंखे खेळत आहे. पुणे संघाने आतापर्यंत चंद्रपूर, अकोला व कल्याण डोंबिवलीच्या संघानं पराभव करीत उपांत्यपूर्व पूर्व फेरीत प्रवेश केला आहे आता त्यांची गाठ रायगड संघासोबत होणार आहे.

माथेरानच्या सेंट झेवीयर्स शाळेत निवेदिताचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुण्यातील सिद्धिविनायक महिला कॉलेज मध्ये प्रवेश घेतला सध्या ती बी कॉम च्या दुसऱ्य शिकत आहे निवेदीतला मॅरेथॉन शर्यत धावण्याची आवड आहे मात्र अकरावीत असताना तिला कोच पल्लवी सरडे यांनी बॉल बॅडमिंटन खेळण्यासाठी प्रोत्साहित केले. गेल्या काही वर्षात बॉल बॅडमिंटन खेळ लोकप्रिय होऊ लागला आहे या खेळात पाच खेळाडूंचा संघ असतो व ३५ पॉईंट्सचा एक सेट असतो तीन सेट खेळले जातात यातील दोन सेट जिंकणारा संघ विजयी होतो. राज्य स्तरीय स्पर्धेतून राष्ट्रीय पातळीवर स्पर्धे साठी महाराष्ट्रचा संघ निवडला जाणार आहे निवेदिता या स्पर्धेत उत्तम कामगिरी करीत असल्याने तिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड अपेक्षित आहे. माथेरान मध्ये काही विद्यार्थ्यांना उपजतच गुण लाभले आहेत. आणि त्यांच्या अंगीकृत असणाऱ्या कलांना खेळांना वाव मिळण्यासाठी स्थानिकांच्या सहकार्याची गरज निर्माण झाली आहे. अशा खेळाडूंना प्रोत्साहित करून जर का आपल्या गावाचे नाव सातासमुद्रापार न्यावयाचे असेल तर सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शक्यतो सर्वतोपरी मदत करणे आवश्यक बनले आहे.आजच्या घडीला माथेरान मध्ये काही वर्षांपासून परिसरातून येऊन याठिकाणी स्थायिक झालेल्या कुटुंबातील मुले घोडेस्वारी मध्ये आपले नाव उज्ज्वल करताना दिसतात. मग पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असणाऱ्या भूमिपुत्रांची मुले का मागे पडत आहेत. त्या मुलांनी फक्त इथले पिढ्यानपिढ्या असणारे व्यवसाय करत बसायचे का ? त्यांनीही आपल्या व्यवसायात बदल करून आधुनिक युगाप्रमाणे आपली आणि आपल्या कुटुंबाची प्रगती कशाप्रकारे करता येईल याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. असाही प्रश्न यानिमित्ताने स्थानीक नागरिक उपस्थित करीत आहेत.



## कंटेनर खाली सापडून मोटारसायकलस्वाराचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील तळोजा गाव भारत पेट्रोल पंपाच्या जवळ झालेल्या विचित्र अपघातात कंटेनर खाली सापडून मोटारसायकलस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

जाबीद हुसेन हा भावाला घेण्यासाठी दहिसर येथे मोटारसायकलवरून येथ असताना तळोजा गाव भारत पेट्रोल पंपाच्या जवळ त्याच्या उजव्या बाजूने येणाऱ्या कंटेनर वरील चालकाने भरधाव वेगाने कंटेनर चालवून त्याच्या मोटारसायकलीस धक्का लागल्याने जाबीद हुसेन हा डाव्या बाजूने जाणाऱ्या दुसऱ्या कंटेनरच्या पाठीमागील उजव्या बाजूच्या चाकाखाली आल्या ने त्यात तो गंभीररित्या जखमी मयत झाला आहे. या अपघाताची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

मा.गुन्नाल साहेब यांचे कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
ॲड.निलम पाटील-मुंडकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६३७/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.०६/०१/२०२३

१) मयत रामचंद्र सिताराम पाटील तर्फे वारस
१/१) श्रीमती.मीना रामचंद्र पाटील
वय : ५५ वर्षे, धंदा : घरकाम
१/२) श्री.महेश रामचंद्र पाटील
वय : वर्षे, धंदा : नोकरी
२) मयत विजय सिताराम पाटील तर्फे वारस
२/१) श्री.विशाल विजय पाटील
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
३) मयत तुलशीराम सिताराम पाटील तर्फे वारस
३/१) श्रीमती.चंद्रभागा तुलशिराम पाटील
वय : वर्षे, धंदा : घरकाम
३/२) सौ.शितल संदीप मढवी
वय : वर्षे, धंदा : घरकाम
रा.मु.तरघर, पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड
३/३) श्री.तुषार तुलशिराम पाटील
वय : वर्षे, धंदा : नोकरी
४) मयत भगवान सिताराम पाटील तर्फे वारस
४/१) श्रीमती.विमल भगवान पाटील
वय : वर्षे, धंदा : घरकाम
४/२) कु.सिद्धेश भगवान पाटील
वय : वर्षे, धंदा : शिक्षण
४/३) कु.सिद्धीका भगवान पाटील
वय : वर्षे, धंदा : शिक्षण
५) श्री.किरण सिताराम पाटील
वय : वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.मु.पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड
६) सौ.पुष्पा स्वामी पाटील
वय : वर्ष, धंदा : गृहिणी
रा.मु.बामणडोंगरी, पो.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
७) श्रीमती.लक्ष्मी मनोहर भगत
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.शेलघर, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर मयत सिताराम बाळू पाटील हे दि.०९/०५/१९९२ रोजी मु.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले आहेत. सदर मयत सिताराम बाळू पाटील यांच्या मालकीच्या मौजे : गव्हाण, ता.पनवेल येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमीन मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी ''नवी मुंबई'' प्रकल्पाकरिता संपादीत केली आहे.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| गव्हाण-७४५ | ३५० | ० | ०-७२-६ पो.ख.०-४-३ | ३-८ |
| गव्हाण-७४५ | ३३७ | ३ | ०-०६-१ पो.ख.०-०-२ | ०-५३ |

वर नमूद संपादीत मिळकतींचे संपादनापोटी अर्जदारांस मौजे : उलवे, ता.पनवेल येथील संपादीत सेक्टर-१९ मधील भूखंड क्र.३३७ हा ७०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड वाटप करण्याचे इरादीत करण्यात आलेले आहे. आता वर नमूद भूखंड वाटप करण्यासंबंधी अर्जदारांनी सिडको कार्यालयात चौकशी केली असता त्यांस सक्षम कोर्टातून मयतांचा वारस दाखला आणण्याकरिता सांगितले. सबब सदर अर्जदारांनी ते मयत सिताराम बाळू पाटील यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करवी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१९ माहे ११ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.गुन्नाल कोर्ट

अर्जदाराचे वकील : ॲड.विजया म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालय

दि.चौ.अर्ज क्र.१५७७/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.२२/१२/२०२२

१) श्री.पंकज राम पाटील
वय : ४४ वर्षे, व्यव : नोकरी
२) श्री.श्रीकांत राम पाटील
वय : ३७, व्यव : नोकरी
३) श्री.रमाकांत राम पाटील
वय : ३६ वर्षे, व्यव : नोकरी
वरील सर्व रा.मु.कोपर (कोल्ही),
ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.विजया राजाराम म्हात्रे
वय : ४१ वर्षे, व्यव : नोकरी
मु.पो.जासई, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

या जाहीर नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते आहे, वरील अर्जदार नं.१ ते ४ यांची आई कै.गुणाबाई राम पाटील ह्या दि.२०/०७/२०२१ रोजी रुम नं.३०३, ग्रीन ॲपल, प्लॉट नं.११२, सेक्टर आर-४, कोपर, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहे. सदर मयत व्यक्तीस खालीलप्रमाणे वारसदार आहेत. त्यांचे नावे असणाऱ्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**अ) जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कोपर, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ. क्र. | मौजे / युनिट केस | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोपर/ १०२/१०३ | १४ | १+३/१ | ०-२०-५ | ३.३२ |
| | | १५ | ४+६+७ | ०-०३-० | ०.५६ |
| | | ९ | ४ | ०-२१-० | ४.५० |
| | | ९ | ८ | ०-०५-० | ०.४७ |
| २ | कोपर/२५ | ५३ | ७ | ०-४५-० | ५.५३ |
| ३ | कोपर/१ बी | ९ | ५ | ०-३-७ | ०.३१ |
| | | ९ | ६ | ०-२-० | ०.०६ |
| | | २७ | १/सी | ०-६-० | १.४४ |
| | | ५७ | १ | ०-१९-८ ०-०-७ पो.ख. | १.९४ |
| | | ९६ | २ | ०-३३-२ ०-०-६ पो.ख. | ३.५९ |
| ४ | कोपर/२३९ | ८८ | ७ | ०-२०-४ | २.१४ |
| ५ | कोपर/२३९ | ९९ | २० | ०-१८-४ | ३.५३ |

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकती ह्या शासनातर्फे सिडकोने संपादीत केल्या असून त्याच्या मोबदल्यात साडेबारा टक्के योजनेंतर्गत मिळणारे भूखंड व वाढीव नुकसान भरपाई तसेच मिळकतीचे ॲवॉर्ड हे कै.राम शंकर पाटील यांचे नावे झाले असून ते मयत झाले आहेत म्हणून श्रीम.गुणाबाई राम पाटील व इतर वारसांनी रितसर कै.राम शंकर पाटील यांचा मे.पनवेल येथील दिवाणी न्यायालयातून यापूर्वीच वारसदाखला घेतलेला असून यांचा चौकशी अर्ज क्र.११७/२०१६ दि.१२/०५/२०१७ असा आहे.

**ब) घर मिळकतीचे वर्णन**
**करंजाडे, आर-४ कोपर, भूखंड क्रं.५**

| सांकेतांक/ इमारत क्रमांक | भूधारकाचे / बांधकाम धारकाचे नाव | सर्वेक्षणानुसार बांधकाम / इमारत क्रमांक | बांधकामाचा वापर | आदेशानुसार भूखंड वाटपाची पात्रता ठरविण्यास अनुज्ञेय क्षेत्र (चौ.मी.) | अनुज्ञेय छपरा खालील क्षेत्र (चौ. मी.) | भूखंड वाटपाचा तपशिल (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|---|---|
| KOP-ICOGD 167 | १) राम शंकर पाटील | KP-320 | निवासी | २१३.४० पैकी | ६८.२ | ६५० पैकी |
| | २) निवृत्ती शंकर पाटील | KP-320/A | | | ३५.२ | |
| | ३) प्रणय संजय पाटील | KP-320/B | | | ३५.२ | |
| | ४) हौसाराम शंकर पाटील | KP-320/c | | | ७४.८ | |

येणेप्रमाणे घर मिळकतीचे वर्णन असून सदरहू घर मिळकत अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.गुणाबाई राम पाटील यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१९ माहे ११ सन २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

मा.सोनावणे सो

अर्जदाराचे वकील : ॲड.रंजन सुर्यकांत पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१६६०/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.२२/१२/२०२२

१) श्रीमती.निलम राजेंद्र दमडे
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : शेती
२) कु.आदर्श राजेंद्र दमडे
वय : १५ वर्षे, व्यवसाय : शेती
३) कु.जित राजेंद्र दमडे
वय : १० वर्षे, व्यवसाय : शेती
सर्व रा.भंगारपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
(अर्जदार क्र.१ स्वतःसाठी तसेच अ.क्र.२
व ३ यांची अज्ञानपालनकर्ती म्हणून) — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, अर्जदार क्र.१ ह्या मयत राजेंद्र बापू दमडे यांच्या पत्नी आहेत. तसेच अर्जदार क्र.२ व ३ ही मयत राजेंद्र बापू दमडे यांचे पुत्र आहेत. राजेंद्र बापू दमडे हे दि.२६/०६/२०२२ या दिवशी मयत झालेले आहेत. मयत राजेंद्र बापू दमडे हे हयात असताना त्यांच्या मृत्यूसमयी त्यांचे नावे असणाऱ्या सामाईक मालकीच्या, ताबेकब्जा वहिवाटीतील व कसवणुकीतील असणाऱ्या शेतजमीन मिळकती आहेत. त्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे दापोली, ता. पनवेल, जि.रायगड | १३१ | ४ | ०.८९.७ | प्रकरण क्रमांक दापोली, युनिट केस क्र.४३ |
| २ | मौजे दापोली, ता. पनवेल, जि.रायगड | १३३ | १ | ०.०४.० | |
| ३ | मौजे पारगाव, ता. पनवेल, जि.रायगड | ११ | १ | ०.४१.० | प्रकरण क्रमांक पारगाव, युनिट केस क्र.३८ |
| ४ | मौजे पारगाव, ता. पनवेल, जि.रायगड | १२ | १ | ०.१६.७ | |
| ५ | मौजे पारगाव, ता. पनवेल, जि.रायगड | १३ | २ | ०.०४.५ | |
| ६ | मौजे पारगाव, ता. पनवेल, जि.रायगड | ४ | १ | ०.६८.७ | |
| ७ | मौजे पारगाव डुंगी, ता. पनवेल, जि.रायगड | ११ | ३ | ०.०७.८ | प्रकरण क्रमांक पारगाव डंगी, युनिट केस क्र.५७ |
| ८ | मौजे पारगाव डुंगी, ता. पनवेल, जि.रायगड | ११ | ४ | ०.१९.४ | |
| ९ | मौजे पारगाव डुंगी, ता. पनवेल, जि.रायगड | ३२ | ५ | ०.३९.२ | |
| १० | मौजे दापोली, ता. पनवेल, जि.रायगड | ७३ | १ | ०.८०.४ | दापोली-११० |
| ११ | मौजे दापोली, ता. पनवेल, जि.रायगड | ११८ | २ ब | ०.२४.० | |
| १२ | मौजे दापोली, ता. पनवेल, जि.रायगड | ११४ | १ | ०.५९.६ | |
| १३ | मौजे दापोली, ता. पनवेल, जि.रायगड | ७४ | २ | ०.१५.० | |
| १४ | मौजे दापोली, ता. पनवेल, जि.रायगड | ११४ | ६ | ०.६७.८ | |
| १५ | मौजे दापोली, ता. पनवेल, जि.रायगड | ११४ | ७ | ०.१६.० | |
| १६ | मौजे दापोली, ता. पनवेल, जि.रायगड | ११८ | २ अ | ०.२३.८ | |
| १७ | मौजे पारगाव, ता. पनवेल, जि.रायगड | ४ | ४ | ०.३८.० | नवी मुंबई प्रकल्पासाठी अधिसुचित परंतु असंपादीत |
| १८ | मौजे दापोली, ता. पनवेल, जि.रायगड | १३४ | ४/ब | ०.१६.४ | नवी मुंबई प्रकल्पासाठी अधिसुचित परंतु असंपादीत |

उपरोक्त वर्णन केलेल्या जमीन मिळकतीपैकी अ.क्र.१ व २ ह्या जमीन मिळकती पनवेल बंदरापलिकडील आणि ठाणे खाडीपलिकडील भूभागाच्या औद्योगिक, वाणिज्यिक व निवासी प्रयोजनासाठी आणि सुनियोजित विकासाकरिता महाराष्ट्र शासनातर्फे सिडकोने ''नवी मुंबई प्रकल्प'' या नावाने शासनाने स्थळनिर्देशित केलेल्या व विशेषत्वाने नवी मुंबई प्रकल्पांतर्गत उभारण्यात येणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी संपादीत करून गावाचे नाव : दापोली युनिट केस क्र.४३ नुसार मयत राजेंद्र बापू दमडे यांचेसह इतर खातेदार यांचे नावे निवाडा घोषित केलेला आहे. तसेच, उपरोक्त वर्णन केलेल्या जमीन मिळकतीपैकी अ.क्र.३ ते ६ ह्या जमीन मिळकती पनवेल बंदरापलिकडील आणि ठाणे खाडीपलिकडील भूभागाच्या औद्योगिक, वाणिज्यिक व निवासी प्रयोजनासाठी आणि सुनियोजित विकासाकरिता महाराष्ट्र शासनातर्फे सिडकोने ''नवी मुंबई प्रकल्प'' या नावाने शासनाने स्थळनिर्देशित केलेल्या व विशेषतत्वाने नवी मुंबई प्रकल्पांतर्गत उभारण्यात येणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी संपादीत करून गावाचे नाव : पारगाव युनिट केस क्र.३८ नुसार मयत राजेंद्र बापू दमडे यांचेसह इतर खातेदार यांचे नावे निवाडा घोषित केलेला अहे. तसेच, उपरोक्त वर्णन केलेल्या जमीन मिळकतीपैकी अ.क्र.७ ते ९ ह्या जमीन मिळकती पनवेल बंदरापलिकडील आणि ठाणे खाडीपलीकडील भूभागाच्या औद्योगिक, वाणिज्यिक व निवासी प्रयोजनासाठी आणि सुनियोजित विकासाकरिता महाराष्ट्र शासनातर्फे सिडकोने ''नवी मुंबई प्रकल्प'' या नावाने शासनाने स्थळनिर्देशित केलेल्या व विशेषत्वाने नवी मुंबई प्रकल्पांतर्गत उभारण्यात येणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी संपादीत करून गावाचे गाव : पारगाव डुंगी, युनिट केस क्र ५७ नुसार मयत राजेंद्र बापू दमडे यांचेसह इतर खातेदार यांचे नावे निवाडा घोषित केलेला आहे. तसेच उपरोक्त वर्णन केलेल्या जमीन मिळकतीपैकी अ.क्र.१० ते १६ ह्या जमीन मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडकोने नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केलेल्या असून त्यांचा भूसंपादनाचा निवाडा युनिट केस क्र.दापोली-११० नुसार मयत राजेंद्र बापू दमडे यांचेसह इतर खातेदार यांचे नावे निवाडा घोषित केलेला आहे. तसेच, उपरोक्त वर्णन केलेल्या जमीन मिळकतीपैकी अ.क्र.१७ व १८ ह्या जमीन मिळकती नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादीत करणेकामी अधिसुचित केलेल्या आहेत. परंतु निवाडा घोषित केलेला नसल्याने जमीन मिळकत अ.क्र.१७ व १८ ह्या जमीन मिळकती असंपादीत आहेत.

उपरोक्त वर्णन केलेल्या सामाईक जमीन मिळकतीस मयत राजेंद्र बापू दमडे यांच्या पश्चात त्यांस अर्जदार हेच वारस आहेत. वरील प्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकती अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

वरील अर्जदार हे मयत राजेंद्र बापू दमडे यांचे वारस नाहीत अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही, असे गृहीत धरुन मे.न्यायालय अर्जदार यांचे वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१९/११/२०२२ या दिवशी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

